महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● रायगड ● पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ❖ ०७ एप्रिल २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २७९ ❖ पाने – ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## GST वसुलीत महाराष्ट्राची विक्रमी कामगिरी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : २०२४-२५ या आर्थिक वर्षात लक्षणीय कामगिरी महाराष्ट्र शासनाने २,२५,३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल संकलन केले आहे. हा आकडा मागील आर्थिक वर्ष २०२३-२४ पेक्षा १३.६ टक्के जास्त आहे. तसेच २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या २,२१,७०० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा जास्त आहे. महसूल विभागाने मूल्यवर्धित करातून (व्हॅट) ही भरपूर कमाई केली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात व्हॅट संकलन ११ टक्क्यांनी वाढून ५९,२३१ कोटी रुपये झाले. गेल्या वर्षी महाराष्ट्राला व्हॅटमधून ५३,३८० कोटी रुपयांचा महसूल मिळाला. व्यावसायिक करातून गोळा होणारा महसूलही चार टक्क्यांनी वाढून ३०७२ कोटी रुपये झाला, जो २०२३-२४ या आर्थिक वर्षात २९५३ कोटी रुपये होता.देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणाऱ्या महसुलात वाढ झाल्यामुळे सरकारी तिजोरीत मोठा कर जमा झाला आहे. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) मधून सर्वाधिक वाढ दर १४.८ टक्के होता. तर देशभरात एकूण जीएसटी महसूल वाढीचा दर फक्त ८.६ टक्के होता आणि या क्षेत्रात महाराष्ट्राने इतर राज्यांपेक्षा खूप वेगाने प्रगती केली आहे. या उल्लेखनीय यशामागे करदात्यांच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी सतत देखरेख आणि पाठपुरावा करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कठोर परिश्रम आहेत.

रिफंड कपातीपूर्वीच्या एकूण जीएसटी महसुलात १५.६ टक्क्यांची लक्षणीय वाढ झाली आहे. हे प्रमाण प्रमुख राज्यांमध्ये सर्वाधिक आहे. जीएसटी महसूल संकलनात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशपेक्षा (८४,२०० कोटी रुपये) महाराष्ट्राने दुप्पट महसूल गोळा केला आहे. देशातील पहिल्या सात राज्यांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक जीएसटी महसूल वाढीचा दर गाठला आहे. महाराष्ट्राला १,७२,३७९ कोटी रुपये जीएसटीतून मिळाले आहेत. त्यापैकी १,१३,७६९ कोटी रुपये राज्य जीएसटी (एसजीएसटी) म्हणून आणि ५८,६१० कोटी रुपये एकात्मिक जीएसटी (आयजीएसटी) म्हणून प्राप्त झाले. शिवाय परताव्यात झालेली वाढ (३०.४ टक्के) करदात्यांना वेळेवर परतावा देण्याची विभागाची क्षमता देखील दर्शवते, ज्यामुळे पुरवठादारांना खेळते भांडवल उपलब्ध होते.

# राज्य पूर्णपणे दुष्काळमुक्त करणे हेच सरकारचे धोरण

## मंत्री विखेंनी सांगितला मेगा प्लॅन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पूर्वी शेतीसाठीच सिंचन व्यवस्था होती. परंतु औद्योगीकरण आणि शहरीकरणामुळे शेतीसाठी उपलब्ध पाणी कमी होत असल्याने, पारंपरिक सिंचन पद्धतीत बदल करून आधुनिक तंत्रज्ञानाचा सिंचनासाठी शेतकऱ्यांनी वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



दुष्काळमुक्त महाराष्ट्र जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्र सरकारचे धोरण आहे की राज्याला पूर्णपणे दुष्काळमुक्त करणे राज्याचे धोरण असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली त्याची कार्यवाही सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पुराचे अतिरिक्त पाणी वाया जाऊ नये म्हणून नदी जोड प्रकल्पांना चालना दिली जात आहे. "राज्याची सिंचन क्षमता पूर्वी 3.86 लाख हेक्टर होती, आता ती 55 लाख हेक्टरवर पोहोचली आहे. यात आणखी वाढ करण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब करण्यावर जोर देऊन पाण्याचे व्यवस्थापन आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा प्रभावी वापर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. आज वातावरणातील बदलाचा मोठा परीणाम सिंचन व्यव्स्थेवर होतो. यासाठी सोलर पॅनलच्या वापरामुळे धरणांवर वीज निर्मिती होईल आणि पाण्याचे बाष्पीभवन कमी करण्याचे शासनाचे प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. उजनी धरणात वाळू आणि गाळ जमा झाल्यामुळे पाण्याची साठवणूक क्षमता कमी झाली आहे, याबाबत लवकरच उपाय योजना करण्यासाठी विभागाचे प्रयत्न असल्याचे त्यांनी आश्वस्त केले. यापुर्वी महाराष्ट्र पाणी परिषदेच्या माध्यमातून स्व. बाळासाहेब विखे पाटील आणि गणपतराव देशमुख यांनी पाणी उपलब्ध होण्यासाठी मोठे काम केले. त्यांना दि. मा. मोरे यांच्या



सारख्या अभ्यासू लोकांची साथ मिळाली आज त्यांच्या प्रस्तावांना पुढे घेवून जाण्याचे काम राज्य सरकार करीत आहे. महाराष्ट्र सिंचन सहयोग या संस्थेच्या माध्यमातून होत असलेल्या ही परिषदेतून येणार्या सूचना आणि शिफारसी राज्य सरकार निश्चित स्विकारेल आशी ग्वाही त्यांनी आपल्या भाषणात दिली.

प्रदूषण आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा मंत्री विखे पाटील यांनी नदीकाठच्या शहरांमधून प्रदूषणयुक्त पाण्याचा उत्सर्जनामुळे प्रभावित गावांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी एकत्रित पाणीसाठे करण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता व्यक्त केली. अनेक धरणात गाळ साठल्याने पाणी क्षमता कमी झालेली असून धरणातील गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढवण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. ही "सिंचन परिषदेच्या माध्यमातून सिंचन व्यवस्थापनाबाबत नागरिकांच्या सूचना आल्यास शासन त्यावर सकारात्मक विचार करून त्या अनुषंगाने धोरण तयार करेल, असे त्यांनी नमूद केले. सिंचन प्रकल्पांना गती जलसंपदाचे सचिव संजय बेलसरे यांनी सांगितले की, सांगोला तालुक्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी सिंचन प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. "सिंचन व्यवस्थापनात आवश्यक बदल सुचवल्यास, त्या सूचना जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सोडविल्या जातील," असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वयंचलित हवामान केंद्राचे उद्घाटन यावेळी भारतीय हवामान खात्याकडून स्थापित स्वयंचलित हवामान केंद्राचे उद्घाटन जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या यंत्राद्वारे हवेतील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग, दिशा आणि पर्जन्यमानाची माहिती पुण्यातील हवामान विभागाला पाठविली जाते. ही माहिती व त्या अनुषंगाने आवश्यक सूचना स्थानिक शेतकऱ्यांना मोबाइलद्वारे पाठवण्याचे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

# गृहपाठ न केल्याने विद्यार्थिनींना अमानुष शिक्षा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या आदिवासी आश्रमशाळेतील चौथी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना शिक्षिकेने केलेल्या शिक्षेमुळे चार दिवसापासून विद्यार्थिनी त्रासात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे स्थानिक पातळीवरून तीव्र संताप व्यक्त होत असून शिक्षिकेवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत येणाऱ्या वसई तालुक्यातील भाताणे-बेलवाडी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा येथे शिक्षण घेणाऱ्या चौथी इयत्तेतील विद्यार्थीनींनी गृहपाठ केला नव्हता. त्यामुळे शिक्षिकेने विद्यार्थिनींना "मी वर्गात बोलवत नाही तोपर्यंत उठाबशा काढा" असे म्हणत शिक्षा केली. यांनतर विद्यार्थीनींनी शंभर पेक्षा जास्त उठाबशा काढाव्या लागल्याची माहिती एका विद्यार्थिनीने दिली. यामुळे तीन ते चार विद्यार्थिनींना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. तीन विद्यार्थिनींचे पाय जास्त प्रमाणात सुजल्यामुळे त्यांना चालण्यास जास्त त्रास होत असल्याचे समोर आले आहे. बुधवार 2 एप्रिल रोजी शाळेच्या वेळेत विद्यार्थिनींना शिक्षा देण्यात आली. जास्त प्रमाणात उठाबशा काढल्यामुळे संध्याकाळ



पर्यंत विद्यार्थिनींच्या पायांना जास्त प्रमाणात सूज येऊन रात्रभर त्यांना त्रास सहन करावा लागला. दुसऱ्या दिवशी मुलींना त्रास सहन होत नसल्यामुळे शिक्षकांनी त्यांना दवाखान्यात नेले. त्याठिकाणी उपस्थित असलेले स्थानिक सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील यांनी अधिक चौकशी केली असता त्यांच्या लक्षात हा प्रकार आला. त्यांनतर त्यांनी मुलींच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून त्यांना या प्रकाराची माहिती दिली. याविषयी कुटुंबीयांनी शिक्षिकेला संपर्क केला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याची माहिती कुटुंबियांकडून देण्यात येत आहे. यांनतर कुटुंबीयांनी शनिवारी शाळेत जाऊन मुलींची चौकशी केली असता मुलींना जास्त प्रमाणात दुखापत झाल्याचे समोर आले आहे. यांनतर कुटुंबीयांनी मुलींना घरी आणले असून त्यांच्यावर सध्या स्थानिक रुग्णालयात उपचार करण्याचा कुटुंबीयांचा प्रयत्न आहे. घटनेला चार दिवस उलटून देखील विद्यार्थिनीची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांना चालण्यासाठी अडचण होत असल्यामुळे कुटुंबीयांना त्यांची काळजी घ्यावी लागत आहे. मुलींना अमानुष शिक्षा दिल्यामुळे संबंधीत शिक्षिकेला देखील कठोर शिक्षा करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. स्थलांतर करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांतील मुलांना योग्य शिक्षण देण्यासाठी शासनाने आदिवासी मुलांसाठी शासकीय आश्रमशाळा उभारल्या आहेत. या शाळांमध्ये राहणाऱ्या मुलांना योग्य आणि दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शासन दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र स्थानिक पातळीवर शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना योग्य वागणूक मिळत नसल्याचे प्रकार अनेक वेळा समोर आले आहेत. वसई तालुक्यातील बेलवाडी आश्रमशाळेतील प्रकारामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याप्रकरणी नेमकी कोणती कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणी एका मुलीचे पालक संदीप तल्हा यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. ते म्हणाले की, "आम्ही वीटभट्टीवर काम करून आमचा उदरनिर्वाह करतो. आम्हाला शिक्षण घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे आमच्या मुलीला शिकवण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही मुलीला शासकीय यंत्रणेच्या भरवशावर शाळेत ठेवले. मात्र शिक्षिकेकडून आमच्या मुलीला अमानुष शिक्षा देण्यात आली. या शिक्षिकेवर कठोर कारवाई करावी अशी आमची मागणी आहे." विद्यार्थीनींनी गृहपाठ केला नसल्यामुळे त्यांना शिक्षा देण्यात आल्याची माहिती शाळा प्रशासनाकडून देण्यात येत आहे. याविषयी अधिक माहिती घेण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत एक समूह पाठवण्यात आला आहे. त्यांच्याकडून योग्य चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल अशी प्रतिक्रिया डहाणू प्रकल्प अधिकारी सत्यम गांधी यांनी दिली.

# भाजपाचे प्राथमिक सदस्य दिड कोटी



## भाजप देशातील सर्वात मोठा पक्ष –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारतीय जनता पार्टी चे १६राज्यात सरकार आहे, पक्षाने लोकशाही सोडली नाही आणि घराणेशाही अंगीकारली नाही, महाराष्ट्रात तर पक्षाची वाटचाल गौरवशाली आहे, घरोघरी जाऊन कार्यकत्यानी सुमारे दिड लाख प्राथमिक सदस्य नोंदणी केली आहे, त्यांचे नंबर घेतले आहेत, त्यामुळे सदस्य बोगस नाहीत, असे ऑनलाईन मार्गदर्शन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिन सोहळयानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.यावेळी कल्याण ग्रामीण आयोजित बैठकीला आमदार किसन कथोरे,प्रदेश कार्यकारणी सदस्य, भरत पाटील, टिडीसीचे उपाध्यक्ष अरुण पाटील, जीवनदीप महाविद्यालयाचे रवींद्र घोंडविदे, झेडपी माझी सदस्यां रेश्मा भोईर, राजाराम चौधरी, संजय शेलार, वसत शेलवलीचे सरपंच, रवींद्र भोईर, कल्याण पंचायत समितीचे माझी उपसभापती यशवंत दळवी, योगेश धुमाळ, घोटस ईचे आजीमाझी सरपंच, आदी कार्यकर्ते, पदाधिकारी, उपस्थित होते.या प्रसंगी भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष, रविंद्र चव्हाण, अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, यांनीही कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले.

भारतीय जनता पार्टी कल्याण ग्रामीण चा हा सोहळा रुंदे येथील शाळेत आयोजित करण्यात आला होता.




# बँक ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवीवर १०० टक्के विमा सुरक्षित करा

## – खा.नरेश म्हस्के

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : बँक ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवीवर 100 टक्के विमा सुरक्षित करा व दिवाळखोरीत गेलेल्या बँकांमधील ठेवीदारांना 100 टक्के परतावा द्यावा, अशी मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत केली.

मस्के म्हणाले की,सध्या भारतातील राष्ट्रीयकृत, खाजगी, परदेशी अथवा सहकारी अशा कोणत्याही बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी या डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन अधिनियम 1961 द्वारे विम्याने सुरक्षित करण्यात येतात. डीआयसीजीसी कायद्याच्या कलम 16 अन्वये सध्या ठेवीदारांच्या फक्त पाच लाख रुपये पर्यंतच्या ठेवींनाच विमा संरक्षणाचे कवच आहे. याचाच अर्थ कोणत्याही ठेवीदाराच्या पाच लाख रुपयांहून जास्त असलेल्या ठेवींना विम्याचे संरक्षण नाही. त्यामुळे जर का एखादी बँक डबघाईला आली अथवा बुडीत खात्यात गेली तर ठेवीदारांच्या पाच लाख रुपयांहून जास्त असलेल्या ठेवी मातीमोल ठरतात. अशा आर्थिक अरिष्टामुळे काही ठेवीदारांचा मृत्यू झाल्याच्याही घटना आहेत.

देशात सध्या काही राष्ट्रीय असो वा खाजगी बँका दिवाळखोरीत किंवा डबघाईला गेलेल्या दिसत आहेत. केंद्राने ग्राहकांच्या आर्थिक संरक्षणासाठी डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन



अधिनियम लागू केला आहे. या नियमानुसार हे महामंडळ बँकांकडून संपूर्ण ठेवींच्या रक्कमांवर प्रीमियम वसूल करते. परंतु जेव्हा एखादी बँक डबघाईस येते अथवा बुडीत खात्यात जाते वा दिवाळखोरीत निघते तेव्हा ठेवीदारांना रक्कम द्यायची वेळ आल्यावर प्रति ठेवीदार फक्त पाच लाख रुपये पर्यंतच्याच ठेवींची भरपाई करण्यात येते, ही बाब आक्षेपार्ह आणि खटकणारी असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

बुडीत खाती अथवा दिवाळीला गेलेल्या बँकेच्या ठेवीदारांना पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी परत केल्यानंतर डीआयसीजीसी या सर्व रक्कमा संबंधित बुडीत खात्यात गेलेल्या बँकेच्या उर्वरीत ठेवी आणि मालमत्तेतून परत वसूल करते. त्यामुळे ज्या ठेवीदारांच्या पाच लाखाहून अधिक ठेवी अशा बँकेत असतील त्यांना त्या नंतर परत मिळण्याची शक्यता आणखीनच दुरावते. त्यामुळे एकीकडे अशा निष्पाप ठेवीदारांना नाहक आर्थिक फटका बसतो आणि दुसरीकडे डीआयसीजीसी सारखे सरकारी महामंडळ एकीकडून प्रीमियम वसूल करते आणि दुसरीकडून परत विम्या पोटी दिलेली रक्कम परत मिळवते आणि लाखो कोटींचा नफा करते. याला विमा योजना कसे म्हणता येईल? ही गंभीर बाब असल्याचे खासदार नरेश म्हस्के म्हणाले.

# जागतिक आरोग्य संघटना

## संयुक्त राष्ट्रांची सार्वजनिक आरोग्य संस्था

जागतिक आरोग्य संघटना (WHO), संयुक्त राष्ट्रांची (UN) विशेष संस्था, जी १९४८ मध्ये स्थापन झाली आणि सुधारित आरोग्य सेवांसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यासाठीसार्वजनिक आरोग्य परिस्थिती. जरी त्यांना महामारी नियंत्रण, क्वारंटाइन उपाय आणि औषध मानकीकरणाशी संबंधित विशिष्ट कामे वारशाने मिळाली असली तरीलीग ऑफ नेशन्सची आरोग्य संघटना (१९२३ मध्ये स्थापन) आणिपॅरिस येथील आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य कार्यालय (१९०७ मध्ये स्थापित), WHO ला त्याच्या संविधानानुसार सर्व लोकांसाठी "सर्वोच्च शक्य पातळीचे आरोग्य" प्राप्त करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी व्यापक अधिकार देण्यात आला होता . WHO आरोग्याची सकारात्मक व्याख्या "पूर्ण शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणाची अवस्था आहे आणि केवळ अनुपस्थिती नाही" अशी करते."रोग किंवा अशक्तपणा." दरवर्षी WHO त्याची स्थापना तारीख, ७ एप्रिल १९४८, म्हणून साजरी करतेजागतिक आरोग्य दिन. जिनेव्हा येथे प्रशासकीय मुख्यालय असल्याने , WHO चे प्रशासन जागतिक आरोग्य सभेद्वारे चालते, जे दरवर्षी सामान्य धोरण-निर्धारण संस्था म्हणून भेटते आणि असेंब्लीद्वारे तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवडलेल्या आरोग्य तज्ज्ञांच्या कार्यकारी मंडळाद्वारे. WHO सचिवालय , जे नियमित कामकाज करते आणि धोरणे अंमलात आणण्यास मदत करते , त्यात तज्ञ, कर्मचारी आणि क्षेत्रीय कामगार असतात ज्यांची नियुक्ती केंद्रीय मुख्यालयात किंवा जगभरातील देशांमध्ये असलेल्या सहा प्रादेशिक WHO कार्यालयांपैकी एकावर किंवा इतर कार्यालयांमध्ये असते. एजन्सीचे नेतृत्व कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या आणि जागतिक आरोग्य सभेने नियुक्त केलेल्या महासंचालकाद्वारे केले जाते. महासंचालकांना एक उपमहासंचालक आणि अनेक सहाय्यक महासंचालकांचे समर्थन असते, ज्यांपैकी प्रत्येकजण WHO चौकटीतील विशिष्ट क्षेत्रात विशेषज्ञ असतो, जसे की कुटुंब, महिला आणि मुलांचे आरोग्य किंवा आरोग्य प्रणाली आणि नवोपक्रम . एजन्सीला प्रामुख्याने सदस्य सरकारांनी पैसे देण्याच्या सापेक्ष क्षमतेच्या आधारावर




दिलेल्या वार्षिक योगदानातून वित्तपुरवठा केला जातो. याव्यतिरिक्त, 1951 नंतर WHO ला UN च्या विस्तारित तांत्रिक-सहाय्य कार्यक्रमातून भरीव संसाधने वाटप करण्यात आली .

WHO अधिकारी वेळोवेळी एजन्सीच्या नेतृत्व प्राधान्यांचा आढावा घेतात आणि अद्यतनित करतात. २०१४-१९ या कालावधीत, WHO च्या नेतृत्व प्राधान्यांचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे होते:

१. सार्वत्रिक आरोग्य कव्हरेजकडे प्रगती करू इच्छिणाऱ्या देशांना मदत करणे

२. आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमांचे पालन करण्याची क्षमता देशांना स्थापित करण्यास मदत करणे

३. आवश्यक आणि उच्च-गुणवत्तेच्या वैद्यकीय उत्पादनांची उपलब्धता वाढवणे

४. सार्वजनिक आरोग्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय घटकांच्या भूमिकेवर लक्ष केंद्रित करणे

५. असंसर्गजन्य रोगांना प्रतिसादांचे समन्वय साधणे

६. संयुक्त राष्ट्रांनी निश्चित केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार सार्वजनिक आरोग्य आणि कल्याणाला प्रोत्साहन देणे.

# शास्त्रज्ञ डॉ शंकर आबाजी भिसे 'भारतरत्न'च्या तोडीचे

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. भारताचे एडिसन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे या महान शास्त्रज्ञाचा जन्म मुंबईमध्ये एका मॅजिस्ट्रेटच्या घरी झाला. दोनशेच्यावर निरनिराळे शोध लावणारे आणि चाळीसहून अधिक शोधांचे एकस्व संपादन करणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता " माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ." असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं.



त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिर्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छापणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. १९१० साली साली डॉ भिसे आजारी असताना त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात आलेलं एक भारतीय औषध फार गुणकारी ठरलं. या औषधाचं रासायनिक पृथःकरण त्यांनी करवून घेतलं आणि त्याच्या गुणकारीपणा आयोडीनामुळे आहे जाणलं. १९१४ साली डॉ शंकर आबाजी भिसे यांनी स्वतःच एक नवीन औषध तयार केले आणि त्या औषधाला बेसलिन हे नाव दिले. हे औषध बाह्योपचारासाठी उपयुक्त ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात वापर केला. या औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. या औषधावर आणखी संशोधन करून आयोडीन घटक असलेलं पण पोटात घेता येईल असं एक औषध नंतर डॉ भिसेंनी तयार केलं या औषधाला ऑटोमेडीयन असं नाव दिलं. हे औषध बऱ्याच रोगांवर उपयुक्त ठरले. पुढे त्यांनी कपडे धुण्यासाठी एक नवे संयुग तयार केले. डॉ भिसे यांनी विद्युत शास्त्रातही अनेक शोध लावले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान संशोधकाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करावा.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# आजच्या पिढीने रामायणातून कोणता धडा घ्यावा

शब्दांकन : रवींद्र घोडविंदे



श्री राम सहज,साधा -सरळ पण दृढनिश्चयी आहेत. ते केवळ आपल्या मित्रांचाच शुभचिंतक नाही तर त्यांच्या आश्रयाला येणाऱ्या शत्रुनाही अभय देतो. राम एक भाऊ, एक पती, एक मित्र आणि एक राजा या अशा सर्व भुमिकांमध्ये अनुकरणीय आहे. तो मर्यादा पुरुशोत्तम आहे.राम म्हणजे आत्मा ज्योती. म्हणजेच, आपल्या हृदयात जो प्रकाश आहे तो राम आहे. राम नेहमी आपल्या हृदयात असतो. श्री रामांचा जन्म आई कौशल्या आणि वडील दशरथ यांच्या पोटी झाला. संस्कृतमध्ये 'दशरथ म्हणजे, 'दहा रथ असलेला. या ठिकाणी दहा रथ म्हणजे, आपल्या पाच ज्ञानेंद्रियांचे आणि ५ क्रिया इंद्रियांचे प्रतीक आहे. तर 'कौशल्य' म्हणजे, 'जो कुशल आहे. रामाचा जन्म तिथेच होऊ शकतो जिथे ज्ञान पंचेंद्रियांच्या आणि पाच इंद्रियांच्या संतुलित कार्यात कार्यक्षमता असते. श्री रामांचा जन्म अयोध्येत झाला. आयोध्याचा याचा शाब्दिक अर्थ 'ज्या ठिकाणी युद्ध होऊ शकत नाही.' जेव्हा आपले मन कोणत्याही संघर्षाच्या स्थितीपासून मुक्त होते. तेव्हाच आपल्या मनात ज्ञानाचा प्रकाश निर्माण होतो.

राम हे आपल्या आत्म्याचे प्रतीक आहे. लक्ष्मण हे सतर्कतेचे प्रतीक आहे. सीता हे मनाचे प्रतीक आहे. तर रावण हे अहंकार आणि नकारात्मकतेचे प्रतीक आहे. जसे पाण्याचा स्वभाव वाहत जाणे आहे, तसाच मनाचा स्वभाव डगमगणे आहे. मनरूपी सीताजी सोन्याच्या हरणाकडे पाहून आकर्षित झाल्या, आपले मन वस्तूंकडे आकर्षित होते. अहंकार रूपी रावण मन रूपी सीताजींचे हरण करतो. अशा प्रकारे मनरूपी सीताजी आत्मरूपी श्री रामांपासून विलग होतात. हनुमानजींना 'पवन' पुत्र म्हणतात. सीताजींना परत आणण्यासाठी ते रामाला मदत करतात. श्वास आणि सतर्कता (हनुमान आणि लक्ष्मण) यांच्या मदतीने मन (सीता) पुन्हा आत्म्याशी (राम) जोडले जाते. अशा प्रकारे संपूर्ण रामायण आपल्यातच घडत असते. रामाच्या जीवनातून मिळालेला मुख्य घडा म्हणजे शिस्त, शिस्त अत्यंत महत्वाची आहे. याशिवाय कोणतेही काम होऊ शकत नाही. दुसरीकडे, सर्जनशीलता आहे. सर्जनशीलतेला थोडी जागा हवी. सर्जनशीलतेला स्वातंत्र्य हवे. सर्जनशीलता आणि उत्पादकता यामध्ये समतोल आहे. तुमच्याकडे उत्तम कल्पना असू शकतात, पण त्या जाणून घेण्यासाठी तुम्हाला शिस्त हवी... एक राजा म्हणून, भगवान श्री रामांच्या राज्यात असेच गुण होते. यामुळेच त्यांचे राज्य विशेष बनले, महात्मा गांधींनीही 'रामराज्य' सारखा आदर्श समाज निर्माण करण्याची कल्पना केली. ज्या राज्यात प्रत्येक व्यक्तीच्या गरजा पूर्ण केल्या जातील. रामराज्य हे गुन्हेगारीमुक्त समाजाचे प्रतिनिधित्व करते. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी गुरूंचे मार्गदर्शन घेण्याची परंपरा राजांच्या भूमिकेत समाविष्ट होती. राम भरतासोबत परतला असता तर रामायण कधीच बनले नसते. रामाने सोन्याच्या हरणाचा पाठलाग केला नसता, तर गोष्ट वेगळीच असती. अशा स्थितीत हनुमानाची भूमिकाच आली नसती. जर हनुमान नाहीत तर रामायणही नाही. मागे वळून पाहताना, या घटना नक्कीच आव्हानात्मक वाटतात, परंतु कदाचित त्या काळातील लोकांसाठी एक आदर्श आहे. म्हणूनच भगवान रामाच्या निर्णयांची गुंतागुंत या महाकाव्याला अधिक समृद्ध करते. भगवान रामाने एक चांगला पुत्र, शिष्य आणि राजा यांच्या गुणांचे एक आदर्श उदाहरण मांडले आहे. यामुळे त्यांना मर्यादा पुरुषोत्तम म्हटले गेले. आजही त्यांचे म्हणजेच 'रामबाण' सारखे शब्द अशा कामांसाठी वापरले जातात, ज्या कामात अपयशाला जागा नाही.

## गीतासार



### अध्याय ६
### आत्मसंयमयोगः

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः । जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ६-४४ ॥

तो श्रीमंतांच्या घरात जन्म घेणारा योगभ्रष्ट पराधीन असला तरी त्या पहिल्या जन्मीच्या अभ्यासामुळेच निःसंशयपणे भगवंतांकडे आकर्षिला जातो. तसेच समबुद्धिरूप योगाचा जिज्ञासूदेखील वेदाने सांगितलेल्या सकाम कर्मांच्या फळांना ओलांडून जातो. ॥ ६-४४ ॥

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः । अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ६-४५ ॥

परंतु प्रयत्नपूर्वक अभ्यास करणारा योगी तर मागील अनेक जन्मांच्या संस्कारांच्या जोरावर याच जन्मात पूर्ण सिद्धी मिळवून सर्व पापांपासून मुक्त होऊन तत्काळ परमगतीला प्राप्त होतो. ॥ ६-४५ ॥

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः । कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ६-४६ ॥

तपस्वी लोकांपेक्षा योगी श्रेष्ठ आहे. शास्त्रज्ञानी पुरुषांपेक्षा सुद्धा श्रेष्ठ मानला गेला आहे. आणि सकाम कर्मे करणाऱ्या माणसांपेक्षा सुद्धा योगी श्रेष्ठ आहे. म्हणून हे अर्जुना, तू योगी हो. ॥ ६-४६ ॥

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना । श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ६-४७ ॥

सर्व योग्यांच्यामध्ये सुद्धा जो श्रद्धावान योगी माझ्या ठिकाणी लावलेल्या अंतरात्म्याने मला निरंतर भजतो, तो योगी मला परमश्रेष्ठ म्हणून मान्य आहे. ॥ ६-४७ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे आत्मसंयमयोगो नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील आत्मसंयमयोगः नावाचा हा सहावा अध्याय समाप्त झाला. ॥ ६ ॥

## आरोग्य

### जेवणात लिंबू पिळण्याचे फायदे

- पचन सुधारते: लिंबू पचन सुधारण्यास मदत करते. हे पोटात आम्लाचे उत्पादन वाढवते, ज्यामुळे अन्न पचणे सोपे होते.
- रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: लिंबू हे व्हिटॅमिन सीचा एक उत्कृष्ट स्रोत आहे, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते. हे शरीराला संसर्गाशी लढण्याची क्षमता प्रदान करते.
- वजन कमी करण्यास उपयुक्त: लिंबूमध्ये असलेले फायबर आणि पेक्टिन वजन कमी करण्यास मदत करतात. हे भूक नियंत्रित करते आणि पोट जास्त काळ भरलेले वाटते.
- हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर: लिंबू पोटॅशियमचा एक चांगला स्रोत आहे, जो रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतो. हृदयाचे आरोग्य राखण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावते.
- त्वचेसाठी फायदेशीर: लिंबूमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे त्वचा निरोगी आणि चमकदार ठेवण्यास मदत करतात. हे त्वचेला मुक्त रॅडिकल्सपासून वाचवते आणि सुरकुत्या कमी करते.
- किडनी स्टोन प्रतिबंधक: लिंबूमध्ये सायट्रिक ॲसिड असते, जे किडनी स्टोन तयार होण्यास प्रतिबंध करण्यास मदत करते.

# मुरबाडमध्ये फिरते पोलीस स्टेशनचा उपक्रम

### पोलीस सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी मुरबाड पोलीसांचे महत्त्वाची पावले !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ठाणे पोलीस अधीक्षक डॉ. डी. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड पोलीस विभागात फिरते पोलीस स्टेशन हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे पोलीस सेवा अधिक लोकाभिमुख करणे, नागरिकांमध्ये कायद्याची जागरूकता वाढवणे तसेच थेट जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्या तक्रारी ऐकणे आणि त्यांचे त्वरित निराकरण करणे.

या उपक्रमाद्वारे पोलीस अधिकाऱ्यांचे पथक गावोगावी जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधत आहे. नवीन कायद्यांची माहिती, सुरक्षेबाबत मार्गदर्शन तसेच जनजागृतीसाठी विविध माहितीपर छत्रपती चित्रफिती दाखवण्यात येतात, विशेष म्हणजे, या उपक्रमात नागरिकांच्या तक्रारी त्यांच्या घरपोच जाऊन ऐकल्या जात आहेत आणि शक्य तितक्या लवकर उपाययोजना केल्या जात आहेत.

हा उपक्रम नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणारा आणि पोलिस व जनतेमधील बंध अधिक बळकट करणारा ठरत आहे. मुरबाडमधील नागरिकांनीही या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले असून, त्यांच्या प्रतिक्रिया अत्यंत सकारात्मक आहेत. जर तुम्हाला यामध्ये एखादे ठिकाण, तारीख, अधिकृत नाव, संपर्क क्रमांक इत्यादी माहिती जोडायची असेल तर नागरिकांनी बिनधास्त सांगावे असे आवाहन पो.नि.संदिप गिते यांनी केले आहे.

# सांवरोली येथील 'आई कारवा देवी' यात्रेला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : ठाणे जिल्ह्यातील देवी भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या भिवंडी तालुक्यातील प्रसिद्ध "आई कारवा देवी" यात्रेला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आई कारवा देवी सेवा कमिटी मंदीर ट्रस्ट यांच्या वतीने ३ व ४ एप्रिल रोजी यात्रेचे आयोजन सांवरोली येथील मंदीर परीसरात करण्यात आले होते. यावेळी अभिषेक, देवीचा जागर, ओटीभरण, दर्शन, देंवरुग ते कारवा देवी मंदीर पालखी सोहळा, महाआरती, महाप्रसाद आदी कार्यक्रम घेण्यात आले. तर यावेळी चैत्र षष्टी म्हणजे ४ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता सुर्यदेवाची आरती करुन सांवरोली येथील विहीरीची पुजा करुन तिला गंगा मानुन कारवा देवीची महीला भक्त कविता पाटील पुर्णा यां पाण्याने भरलेले कलश डोक्यावर घेऊन वाजत गाजत सर्व भक्तांचा मेळा मंदीराकडे निघतो यावेळी रस्त्यात असलेल्या उंबराच्या झाडाखालील देवींना व मंदीरातील "साती आसरा" यांना अभिषेक केला जातो यात्रेतील हा विधी महत्वाचा मानला जात असल्याने तो पाहण्यासाठी व दर्शनासाठी नागरीकांनी गर्दी केली होती. या सर्व विधीसाठी जी गंगा लागते त्याची पुर्तता देवी भक्त सुधीर ईताडकर पुर्णा यांच्याकडून केली जाते. तर मंदीर परिसरात विविध खेळणी, हार, श्रीफळ, खाद्यपदार्थ , गृहोपयोगी वस्तू, प्रसादाचे स्टॉल लावण्यात आले होते यावेळी "आई कारवा देवी" मंदीर ट्रस्ट कमिटीच्या वतीने उपस्थीत मान्यवरांचे कारवा देवीची प्रतिमा ,श्रीफळ व महीलांना साडी देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी दोन दीवसात अंदाजे पंचक्रोशीतील हजारो नागरीकांनी देवीचे दर्शन घेतले ही यात्रा यशस्वी करण्यासाठी "आई कारवा देवी" सेवा कमिटी ट्रस्ट पदाधिकारी सदस्यांनी स्थानिक नागरिकांनी मेहनत घेतली.

## वाचक मनोगत

### चटका लावणारी एक्झिट



अभिनयाच्या विविध कंगोऱ्यातून अंगीकारलेल्या भूमिकेला रसिक प्रेक्षकांच्या केवळ पसंतीसच नव्हे तर लक्षवेधी अशी भूमिका साकारून आनंद देणारे अभिनेते डॉक्टर विलास उजवणे यांचे अकस्मात जाणं मनाला चटका लावून गेलं. जीव ओतून काम करण्याची हातोटी, दमदार आवाजातील वैशिष्ट्यपूर्ण स्वच्छ, सुस्पष्ट, पहाडी संवादफेक, सहज, सुंदर, नैसर्गिक मुद्राभिनय ही त्यांची खास आयुधं होती. डॉक्टरांनी सुमारे सदुसष्ट मराठी नाटके, एकशे दहा अधिक चित्रपट, एकशे चाळीस मालिका साकारत हिंदीतही आपल्या अभिनयाची छाप तेवढ्यात ताकदीने उमटवली. चार दिवस सासूचे, दामिनी, वादळवाट आदी अनेक मालिकां, नाटक, चित्रपटांमधून महत्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारत त्यांनी आपल्या अभिनयाचे विविधांगी कंगोरे पेश करून जो आनंद दिला तो कायम रसिक मनावर राहणार आहे. अनोखी अभिनय शैली आणि संवाद पैकीच्या बळावर कलाक्षेत्रात वेगवेगळे स्थान निर्माण करणारे डॉक्टर विलास उजवणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

- विश्वनाथ पंडित, ठाणे

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
Follow, Unfollow, & Create Them
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# गतिमान आणि बदलत्या जगामध्ये सामाजिक बांधिलकी जाणीव राहणार की नाही

## – पद्मश्री प्रकाश आमटे

**याज्ञवल्क्य पुरस्कार सोहळ्यात माजी प्र- कुलगुरू डॉ. नरेशचंद्र, सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई धारप आणि वरिष्ठ संपादक मिलिंद बल्लाळ यांचा सन्मान**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पूर्वीपेक्षा आजचे जग हे अतिशय गतिमान झाले असून तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे सतत बदलत आहे. अशा परिस्थितीत लोकांच्या मनामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव राहील की नाही अशी चिंता पद्मश्री आणि रॅमसेसे पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रकाश आमटे यांनी व्यक्त केली. कल्याणातील नामांकित याज्ञवल्क्य संस्थांच्या पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यंदाचा याज्ञवल्क्य पुरस्कार हा मुंबई विद्यापीठाचे माजी प्र- कुलगुरू डॉ. नरेश चंद्र यांना तर सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई धारप यांचा सुशीलाबाई एकलहरे आणि वरिष्ठ संपादक मिलिंद बल्लाळ यांना विशेष पुरस्कार देऊन यावेळी गौरवण्यात आले. कल्याणातील आचार्य अत्रे रंगमंदिरात पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे, मंत्री आशिष शेलार यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत हा शानदार सोहळा संपन्न झाला.

मी आणि माझी पत्नी मंदाकिनी आम्ही गेल्या 30 वर्षामध्ये बाहेर कुठेही गेलो नाही. मात्र आता आमच्या पुढच्या पिढीने लोक बिरादरीची धुरा आपल्या खांद्यावर घेतली असल्याने आम्ही बाहेर पडू शकत असल्याचे त्यांनी सांगितले. तर याज्ञवल्क्य संस्था आणि पुरस्काराबाबत बोलताना ते म्हणाले की अशा प्रकारच्या सामाजिक पुरस्कारांनी आपल्या कामाची माहिती इतरांपर्यंत पोहोचतेच. पण त्याचसोबत इतरांनाही अशाप्रकारचे काम करण्याची प्रेरणा मिळते. आजतागायत आम्ही निरपेक्ष बुद्धीने काम केले असून कधीच कोणत्याही गोष्टीची अपेक्षा केली नाही. एकमेकाना मदत करणे हा आदिवासी समाजाचा त्यांचा धर्म असून त्यामुळे आमच्या जीवनात मोठा बदल झाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

दुसऱ्याच्या आत्म्याला मुक्ती देण्याचे वरदान देऊन परमेश्वराने यांना पाठवले आहे. हेतूशी प्रामाणिक राहणे सोपे नाही, या सामाजिक व्यक्ती आपल्या हेतूशी प्रामाणिक आहेत. दुसऱ्यासाठी करायची तळमळ, आम्हाला मतांसाठी असते , या मंडळींना कुठुन येते या प्रश्नाचे उत्तर म्हणजे दैवी देणगी असावी. त्यांच्यातील या प्रेरणेला पुरस्कार देणारा सोहळा म्हणजे याज्ञवल्क्य पुरस्कार सोहळा आहे. आपण समाजासाठी काही तरी देणं लागतो याची जाणीव करून देणारे कार्यक्रम म्हणजे हा याज्ञवल्क्य पुरस्कार सोहळा असल्याचे गौरवोद्गार राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी यावेळी काढले.

बिर्ला महाविद्यालयाच्या वतीने आपण हा याज्ञवल्क्य पुरस्कार नम्रपणे स्वीकारत आहे. बिर्ला महाविद्यालयाची प्रगती ही आजी माजी विद्यार्थी, शिक्षक आणि व्यवस्थापन समिती यांचे एकत्रित प्रयत्नांतून झाली आहे. बिर्ला महाविद्यालय हे आपल्या सर्वांचे असून शहरातील प्रत्येक घरात आमच्या महाविद्यालयाचा विद्यार्थी असेल ही अभिमानास्पद बाब असल्याचे डॉ. नरेश चंद्र यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना सांगितले. तसेच यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ते अतिशय भावुक झाले होते.

सामाजिक कार्यकर्ते प्रकाश आमटे यांच्या हस्ते हा विशेष पुरस्कार मिळणे हे माझे भाग्य असून माझे वडील कै. नरेंद्र बल्लाळ यांना हा पुरस्कार आपण अर्पण करत आहे. त्यामुळे या सामाजिक बांधिलकीची किनार या पुरस्काराला लाभलेली असून आपण त्याच मार्गांवर पुढे चालू असे मत दैनिक ठाणे वैभवचे संपादक मिलिंद बल्लाळ यांनी व्यक्त केले.

हा पुरस्कार आपण स्वीकारला असला तरी त्यामागे अनेक हात असून त्यांच्या जीवावर आपण हा पुरस्कार स्वीकारत आहे. मोबाईलमुळे मुले अभ्यास करत नसल्याची खंत यावेळी सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई धारप यांनी पुरस्काराला उत्तर देताना व्यक्त केली. यावेळी विद्याताई धारप यांना सुशीलाबाई एकलहरे पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्याला डॉ. कलिका एकलहरे, कल्याण पूर्व आमदार सुलभा गायकवाड, महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक श्रीकांत बोजेवार, माजी आमदार नरेंद्र पवार, बिर्ला ग्रुपचे अध्यक्ष ओ.आर. चितलांगे, केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, कल्याण आयएमए अध्यक्ष डॉ. सुरेखा ईटकर यांच्यासह अनेक मान्यवर

# ठाकरे गटाकडून दिवा शहरात प्रभू श्रीरामाची महाआरतीचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : प्रभू श्रीराम नवमी निमित्त दिव्यात शिवसेना ठाकरे गटाकडून महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दिवा स्टेशन बाहेर भव्य प्रभू श्रीराम मूर्ती उभारली असून त्याची पूजा करून प्रभू श्रीरामाचा पाळणा देखील गायला. यावेळी भावीकांनी, दिवेकरांनी पूजा आणि आरतीसाठी गर्दी केली होती. या कार्यक्रमाचे आयोजन दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे, दिवा शहर संघटिका ज्योती पाटील, महिला उपशहर संघटिका मयुरी पोरजी यांनी केले होते. यावेळी ठाकरे गटाच्या महिला विभाग संघटिका राजश्री मुंडे, विभाग प्रमुख शनिदास पाटील, संजय जाधव, उप विभाग प्रमुख योगेश निकम, संदीप राऊत, सुहासिनी गुळेकर, कल्पिता मुंडे, संजय अरदालकर, राजेश गोफने, धनाजी पवार आणि इतर कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# उल्हासनगरातील रस्त्यांचा दर्जा सुधारणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शहरातील खराब रस्त्यांबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत उल्हासनगर महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी आता 'हॉट मिक्स हॉट लेड' पद्धतीने डांबरीकरण करण्याचे आदेश दिले आहेत. प्रशासनाने वारंवार दिलेल्या आश्वासनांनंतरही निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण होत असल्यामुळे नागरिक संतप्त होते. अनेक रस्त्यांवर पहिल्याच पावसात खड्डे पडले. परिणामी, वाहतूक कोंडी आणि अपघातांची संख्या वाढली. याला कारणीभूत ठेकेदारांवर आता कडक कारवाई केली जाणार आहे. शहरातील प्रत्येक डांबरीकरणाचे काम 'हॉट मिक्स-हॉट लेड' तंत्रज्ञानानेच करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उल्हासनगर शहरातील बहुतांश मुख्य आणि उपरस्ते खराब अवस्थेत आहेत. गेल्या काही महिन्यांत झालेल्या डांबरीकरणाच्या कामांत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याची तक्रार नागरिकांनी वारंवार केली. याच पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी कठोर निर्णय घेत 'हॉट मिक्स हॉट लेड' तंत्रज्ञानाचा वापर बंधनकारक करण्याचे आदेश दिले आहेत. आयुक्तांनी घेतलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. या तंत्रज्ञानाचा योग्य वापर झाल्यास शहरातील रस्त्यांचे आयुष्य वाढू शकते आणि नागरिकांना दर्जेदार रस्ते मिळू शकतात. मात्र, या निर्णयाची कठोर अंमलबजावणी आणि दोषींवर कारवाई होणे आवश्यक आहे. उल्हासनगरकरांनी प्रशासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. मात्र, हा निर्णय किती प्रभावी ठरतो आणि रस्त्यांची प्रत्यक्ष सुधारणा होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### तंत्राची वैशिष्ट्ये

* डांबर आणि खडीचे मिश्रण १४००-१६०० अंश तापमानावर गरम करून तयार केले जाते.
* हे मिश्रण थेट गरम स्थितीत रस्त्यावर टाकून वळणदार रोलरने समतोल दाब दिला जातो.
* यामुळे रस्त्यावर अधिक मजबूत आणि टिकाऊ थर तयार होतो.
* रस्त्यांची जाडी योग्य प्रमाणात ठेवली जाते. त्यामुळे ते लवकर खराब होत नाहीत.
* ही पद्धत भारतीय रस्ते महासभेने मान्य केली असून सरकारने २०१६मध्ये ती बंधनकारक केली आहे.

### आयुक्तांचे निर्णय

उल्हासनगर शहरातील डांबरीकरणाच्या कामांची सखोल चौकशी केल्यानंतर प्रशासनाला आढळले की, बहुतांश ठिकाणी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले आहे. याच पार्श्वभूमीवर आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांचे डांबरीकरण आता 'हॉट मिक्स हॉट लेड' पद्धतीनेच केले जाईल, असा निर्णय घेतला आहे. काम सुरु होण्यापूर्वी आणि पूर्ण झाल्यानंतर प्रयोगशाळा चाचणी अनिवार्य असेल. कामाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रण अधिकारी नियुक्त केले जातील. निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकले जाईल आणि त्यांच्यावर आर्थिक दंड ठोठावला जाईल. डांबरीकरणाचे काम पाच वर्षांच्या हमी कालावधीसह दिले जाणार आहे.



"उल्हासनगरच्या रस्त्यांची दुरवस्था थांबवण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. यापुढे सर्व डांबरीकरण 'हॉट मिक्स हॉट लेड' या मान्यताप्राप्त तंत्रज्ञानानेच करण्यात येईल. दर्जावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक कामाची गुणवत्ता चाचणी, देखरेख आणि प्रयोगशाळा तपासणी केली जाईल. निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई केली जाईल आणि त्यांना काळ्या यादीत टाकण्यात येईल. नागरिकांचा पैसा व वेळ वाया न जाऊ देता, शहरात टिकाऊ आणि सुरक्षित रस्ते तयार करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. - मनीषा आव्हाळे, आयुक्त, उल्हासनगर महापालिका

# मुरबाड मधिल ब्राह्मणगाव येथे रामनवमीचा उत्सव साजरा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : प्रभु श्रीरामचंद्र यांचा जन्मदिवस म्हणजेच श्रीरामनवमी रामजन्मभूमी असलेल्या आयोध्येसह संपूर्ण देशभरात भक्तीमय वातावरणात व जल्लोषात साजरा केली जाते.

मुरबाड शहरातील प्राचिन श्रीराम मंदिरासह ग्रामीण भागात ब्राम्हणगाव, सरळगाव, सासणे, नढई धसई, टोकावडे या ठिकाणी रामनवमीचा उत्सव साजरा होत असतो. कुठे श्रीराम कथा, कुठे पारायण, तर काही ठिकाणी हरिपाठ, भजन, किर्तनाचा जयघोषात रामजन्मोत्सव साजरा केला जातो.

ब्राम्हणगाव येथिल प्रसिद्ध उदोजक तथा मुरबाड नगरपंचायतचे नगरसेवक विनोदशेठ नार्वेकर हे गेली अनेक वर्ष मोठ्या भक्ती भावात रामजन्मोत्सव साजरा करत असतात. आदल्या दिवशी हरिपाठ, जागर भजन व किर्तनसेवा असते तर रामनवमीच्या सकाळी पुन्हा प्रवचन, भजन व किर्तन सेवा होत असते .दुपारी ठिक 12 वाजता रामजन्मोत्सव साजरा केला जातो.

या राम जन्मोस्तवाला दरवर्षी स्थानिक आमदार किसन कथोरे, माजी आमदार गोटिराम पवार, सुभाष पवार, मुरबाड नगरपंचायतचे आजि-माजी नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी, विविध राजकीय पक्षांचे राजकीय पुढारी, पोलीस अधिकारी- कर्मचारी , पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह पंचक्रोशीतील हजारो रामभक्त दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेत असतात.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ मंडळ ब्राह्मणगाव ,धानिवलि यांचे मोलाचे सहकार्य लाभते. तर यावेळी माऊली सुरसंध्या कान्होळ यांच्या अप्रतिम संगित भजन गायनाने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

# 'सन्मान महाराष्ट्राचा २०२५' कर्तृत्वाचा उत्सव बीकेसी ग्राउंडवर होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, क्रीडा, कला, साहित्य, विज्ञान आणि विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करणारा 'सन्मान महाराष्ट्राचा २०२५' हा दैदिप्यमान पुरस्कार सोहळा ३१ मे रोजी वांद्रे येथील एमएमआरडीए ग्राउंडवर संपन्न होणार आहे. अभिनेता, लेखक, वक्ता शरद पोंक्षे यांनी या सोहळ्याची माहिती सोशल मीडियावर दिली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाची मान्यता प्राप्त 'अर्थ' या सामाजिक संस्थेतर्फे आयोजित हा पुरस्कार सोहळा तिसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्षेत्रांतील १२ कर्तृत्ववान व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षीसुद्धा अशा व्यक्तींना गौरवण्यात येणार आहे ज्यांचे कार्य प्रभावी आणि उल्लेखनीय असले तरी प्रसिद्धीझोतात आलेले नाही.

यंदाच्या सोहळ्याचे सूत्रसंचालन शरद पोंक्षे यांच्यासह छोटया पडद्यावरील हरहुन्नरी कलाकार गौरव मोरे करणार असून, पुरस्कार वितरणासह संगीत-नृत्याने नटलेले भव्य सादरीकरणही होणार आहे. हा सोहळा महाराष्ट्राची समृद्ध परंपरा आणि उज्वल भविष्य यांचा संगम असणार आहे. हा सोहळा सर्वांसाठी विनामूल्य खुला असणार आहे.

गेल्या दोन वर्षांमध्ये या सोहळयाला मोठा प्रतिसाद लाभला असून, यापूर्वी पद्मश्री दादा इदाते (सामाजिक), पद्मश्री गिरीश प्रभुणे (शैक्षणिक), पद्मश्री राहीबाई पोपेरे (कृषी), श्री प्रवीण दीक्षित (मा.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य), महेश झगडे (आरोग्य), डॉ. पंकज चतुर्वेदी (आरोग्य), श्री इंद्रनील चितळे (चितळे बंधू), महेश कोठारे, आकाश ठोसर, दिग्पाल लांजेकर (सांस्कृतिक आणि मनोरंजन) यांसारख्या मान्यवरांना या मंचावर गौरवण्यात आले आहे.

'अर्थ' संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष प्रवीण कलमे, तसेच सीईओ प्रविणा कलमे म्हणतात, "महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या, पण प्रसिद्धीपासून दूर राहिलेल्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचा सन्मान करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. यंदाही साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान, आरोग्य, संरक्षण, कृषी अशा विविध क्षेत्रांतील अशा प्रतिभावान व्यक्तींना प्रकाशझोतात आणण्याचा आमचा प्रयत्न आहे."

यावर्षीही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील असे काही मान्यवर सन्मानित होणार आहेत, ज्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असूनही ते अद्याप व्यापक स्तरावर पोहोचलेले नाही.

"आपल्या ओळखीतील अशी व्यक्ती जिचे कार्य महाराष्ट्राच्या प्रगतीत महत्त्वाचे योगदान देते, पण ज्याला अपेक्षित प्रसिद्धी मिळालेली नाही, अशा व्यक्तींची माहिती आम्हाला कळवावी. आमची निवड समिती त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करून पुरस्कारांसाठी निवड करेल, असे प्रविणा कलमे म्हणाल्या.

### संयुक्त राष्ट्रसंघ मान्यताप्राप्त 'अर्थ' संस्थेचा पुढाकार

२०१५ पासून कार्यरत असलेल्या 'अर्थ' संस्थेला २०१९ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची (UN) मान्यता मिळाली आहे. ही संस्था संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्टांवर कार्यरत असून, समाजात आणि व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवण्यासाठी कटिबद्ध आहे. 'सन्मान महाराष्ट्राचा २०२५' हा सोहळा महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या सन्मानाचा सोहळा असणार आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि संस्कृतीचा सन्मान करणारा भव्य दिव्य दिमाखदार सोहळा उपस्थित राहून अनुभवण्यासाठी आपली जागा +९१ ८४९६९ ८४९६९ या क्रमांकावर व्हॉट्सअप मेसेज करून आरक्षित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.




# टिटवाळा परिसरातून अल्पवयीन शाळकरी मुलगी बेपत्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टिटवाळा येथील बनेली परिसरातून एक १५ वर्षाची अल्पवयीन शाळकरी मुलगी बुधवारी राहत्या घरातून बेपत्ता झाली आहे. या मुलीच्या आई, वडिलांनी आपले नातेवाईक, घर परिसरात खूप शोध घेतला पण ती आढळून आली नाही. त्यामुळे मुलीला कोणीतरी फूस लावून पळवून नेल्याचा संशय घेत कुटुंबीयांनी टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.मुलीच्या आईने टिटवाळा पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की आम्ही पती, पत्नी, आमची तीन मुले टिटवाळा बनेली भागात राहतो.

आमची १५ वर्षाची मुलगी टिटवाळा भागातील एका शाळेत इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत आहे. बुधवारी तिची तब्येत ठिक नव्हती. म्हणून ती शाळेत गेली नाही. मुलीचे वडील टॅक्सी चालक आहेत. मी स्वता मुंबईतील आस्थापनेत खासगी नोकरी करते.बुधवारी अकरा वाजेपर्यंत मुलगी घरात होती. दुपार दोन नंतर मुलीचे वडील घरी आले. तेव्हा घराच्या दरवाजाला कुलूप होते. म्हणून त्यांनी आपल्या मुलीला संपर्क केला. तिने प्रतिसाद दिला नाही. मुलगी प्रतिसाद देत नाही म्हणून आई, वडिलांनी टिटवाळा, बनेली परिसरात, आपल्या नातेवाईक, मुलीच्या मैत्रिणींकडे तपास केला. ती कोठेही आढळून आली नाही. त्यामुळे मुलीला कोणीतरी फूस लावून पळवून नेला असल्याचा संशय व्यक्त करत मुलीच्या आईने टिटवाळा पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार केली आहे. मुलगी हिंदी भाषिक आहे. तिच्याकडे रेडमी कंपनीचा मोबाईल आहे, असे तक्रारीत म्हटले आहे. टिटवाळा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून बेपत्ता मुलीचा शोध सुरू केला आहे.



गेल्या काही दिवसापूर्वी डोंबिवली पूर्वेतील शिळफाटा भागात एका घरातील दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत. डोंबिवली, कल्याण परिसरातून अल्पवयीन मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत चालल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. गेल्या आठवड्यात शिळफाटा रस्त्यावरील रिजन्सी अनंतम गृहसंकुल भागात एका रिक्षा चालकाने एका बालकाचे खंडणीसाठी अपहरण केले होते. मानपाडा पोलिसांनी शिताफीने तपास करून तीन तासाच्या आत बालकाची अपहरणकर्ता रिक्षा चालकाच्या तावडीतून बालकाची शहापूर परिसरातून सुटका केली होती. दोन कुटुंबीयांमधील घरघुती वादातून मुलांना लक्ष्य केले जात असल्याच्या तक्रारी आहेत.

टिटवाळा परिसरात बेकायदा चाळींमध्ये स्वस्तात घर मिळत असल्याने मुंबई परिसरातील झोपड्या, चाळींमधील रहिवासी याठिकाणी कायमस्वरुपीसाठी निवासासाठी दाखल झाले आहेत. घरासमोरील जागेचे वाद आणि किरकोळ विषयांवरून त्यांच्यात भांडणे होतात. त्याचा राग मुलांवर काढण्यात येत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येते.

# परदेशी पदवी शिक्षणासाठी UGCचे नवे नियम लागू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) आज परदेशी पदवी शिक्षणासाठी नवीन नियम लागू केले आहेत. त्याला Recognition and Grant of Equivalence to Qualifications Foreign Educational Institution Regulation 2025 असे नाव देण्यात आले आहे. यानुसार, परदेशी संस्था भारतीय विद्यार्थ्यांना देशातच शैक्षणिक पात्रता पदवी प्रदान करू शकतील. या नियमाचा उद्देश विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठांमध्ये जाण्यापासून रोखणे आहे. नवीन नियमांनुसार, शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांकडून मिळालेल्या परदेशी पात्रतेचे मूल्यांकन करण्यासाठी एक सोपी आणि सोपी यंत्रणा तयार केली जाईल. हे नियम भारतातील वैद्यकीय, फार्मसी, नर्सिंग, कायदा, आर्किटेक्चर आणि कायद्याशी संबंधित विषयांमध्ये देण्यात येणाऱ्या पदव्यांवर लागू होणार नाहीत.

# पलावा येथे रामनवमी निमित्त भव्य पालखी यात्रा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गोल्फ लिंक्स फेडरेशन, कासा बेला गोल्ड आणि कासा बेला फेडरेशन यांच्या वतीने रामा नवमी निमित्त पलावा येथे भव्य रथयात्रा आणि पालखी यात्रा काढली होती. या यात्रेला पलावा तील भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या यात्रेचे मनसेचे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांच्या तर्फे भव्य स्वागत करण्यात आले. राजू पाटील यांच्या पत्नी योगिता पाटील यांनी पालखीचे स्वागत करत दर्शन घेतले. तसेच डोंबिवली भाजपाचे आमदार तथा प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ही आपल्या परिवारासह पालखीचे दर्शन घेतले. या यात्रेमध्ये सामाजिक कार्यकर्ते चेतन तायशेट्ये आणि मनसेचे पदाधिकारी योगेश पाटील यांची उपस्थिती होती.

## आई वडिलाच्या पुण्यस्मरणानिमित्त
# रक्तदान शिबीर




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : वडील वै ह भ प श्री बाळू बांगो जाधव व आई वै ह भ प रखमाबाई बाळू जाधव यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन दत्त मंदिर हॉल फळेगाव टिटवाळा रोड येथे करण्यात आले होते या कामी सेंट्रल हॉस्पिटल उल्हासनगर -3 चे डॉक्टर वाघमारे व त्यांची टीम यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिर पार पाडण्यात आले फळेगाव ग्रामस्थ नातेवाईक व मित्रपरिवार यांनी रक्तदान केले

हा छोटासा उपक्रम आम्ही सामाजिक जाणीवेतुन राबवला असे श्री काशिनाथ जाधव सर यांना विचारले असता त्यांनी सांगितले या सामाजिक उपक्रमासाठी कु भूषण माळू गायकर वाशिद कु अक्षय बालाराम बांगर रुन्दे श्री गोपीनाथ सुदाम भोईर उशिद श्री दीपक रामचंद्र घोडवींदे सारमाळ जितेंद्र बाळू जाधव खातिवली मार्तंड जमदरे, पुंडलिक कंटे, हवेश सुरोशे,मुरबाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच या प्रसंगी श्री भगवान तारमळे, श्री रुपेश पितांबरे, श्री रमेश भोईर, आत्माराम तारमळे, उशीद श्री बळीराम झीप्पा जाधव, व दत्तात्रय बाळू जाधव हे उपस्थित होते.

## रामायण मालिकेतील
# राम-सीता दिसणार ऐतिहासिक भूमिकेत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : रामायण मालिकेतील प्रसिद्ध अभिनेते अरुण गोविल आणि अभिनेत्री दीपिका चिखलिया आता एका ऐतिहासिक सिनेमात दिसणार आहे. श्रीरामनवमीच्या निमित्तानं या दोघांचं एक आकर्षक पोस्टर प्रदर्शित झालं आहे. 'वीर मुरारबाजी.. पुरंदरकी युद्धगाथा' या महत्त्वाकांक्षी हिंदी चित्रपटात ही जोडी छत्रपती शहाजीराजे भोसले आणि राजमाता जिजाऊ यांच्या भूमिकेत दिसणार आहे. भाऊसाहेब आरेकर यांनी चित्रपटाच्या निर्मितीची जबाबदारी सांभाळली आहे तर दिग्दर्शन अजय-अनिरुद्ध यांनी केले आहे.

ऐतिहासिक चित्रपटात एकत्रित काम करण्याचा योग या निमित्तानं जुळून आला असून या भूमिकेसाठी आम्ही तितकेच उत्सुक होतो, असं हे दोघे सांगतात. छत्रपती शहाजीराजे भोसले आणि राजमाता जिजाऊ यांची भूमिका करायला मिळणं आमच्यासाठी खूपच आनंददायी होतं. ज्या उत्तुंग व्यक्तिमत्वांनी आपला प्रेरणादायी इतिहास घडवला, समाजाला नवा विचार दिला, अशी भूमिका साकारताना सोबत मोठी सामाजिक जबाबदारी नक्कीच असते, असं प्रांजळ मत या दोघांनी व्यक्त केलं.

पुरंदरच्या वेढ्याप्रसंगी झालेल्या युद्धात पराक्रम गाजवणाऱ्या नरवीर मुरारबाजी देशपांडे यांचा पराक्रमी इतिहास आजही प्रेरणा देणारा आहे. स्वराज्याच्या इतिहासात पुरंदरचे 'काळभैरव' म्हणून ओळख असणारे मुरारबाजी देशपांडे यांची यशोगाथा 'वीर मुरारबाजी...पुरंदर की युद्धगाथा' या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. चित्रपट कधी प्रदर्शित होणार हे अजून जाहीर झालेले नाही.

# कल्याणात भव्य सायकल रॅलीद्वारे अग्निशमन सुरक्षा जनजागृती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वाढत्या आगीच्या घटना रोखण्यासह त्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी केडीएमसी अग्निशमन दलातर्फे आयोजित सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. आधारवाडी येथील मुख्य अग्निशमन केंद्रापासून संपूर्ण शहरभर ही रॅली काढण्यात आली.14 ते 21 एप्रिल दरम्यान संपूर्ण राज्यभरात अग्निशमन दल सप्ताह साजरा करण्यात येतो. त्याचाच एक भाग म्हणून केडीएसमी अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी आणि केडीएमसीचे सायकल उपक्रमाचे नोडल अधिकारी प्रशांत भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य सायकल रॅली काढण्यात आली. केडीएमसीचे उपायुक्त संजय जाधव, ब्रँड ॲम्बेसेडर डॉ. प्रशांत पाटील, 4 आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन धावपटू दिलीप घाडगे यांनी झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात केली.

ज्यामध्ये कल्याण सायकलिस्ट असोसिएशन, कल्याण पूर्व सायकलिस्ट असोसिएशन, डोंबिवली सायकलिस्ट असोसिएशन, पलावा सायकलिस्ट असोसिएशन, हिरकणी सायकल ग्रुप आदी सायकल संघटनांच्या 200 सदस्यांसह अनेक हौशी सायकलपटूही उत्साहाने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे यामध्ये प्रोफेशनल सायकलिस्ट सोबतच महिला आणि विद्यार्थी वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होता. एक चिंगारी करू शकते नुकसान भारी, आपातकालीन परिस्थितीत लिफ्टऐवजी जिन्याच्या वापर करा, आपली सुरक्षा आपला अधिकार, इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा सतत कार्यान्वित ठेवा अग्निशमन जनजागृतीपर विविध माहितीपूर्ण फलक या सायकलसमोर लावण्यात आले होते.कल्याण पश्चिमेतील आधारवाडी मुख्य अग्निशमन केंद्रापासून सुरू झालेली ही रॅली लालचौकी, सहजानंद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, मुरबाड रोड, बिर्ला कॉलेज, खडकपाडा, आधारवाडी चौक मार्गे पुन्हा अग्निशमन दल मुख्यालयात समाप्त झाली. दरम्यान यावेळी कल्याण डोंबिवली महापालिका अग्निशमन विभागाने एक माहिती पुस्तिका तयार केली असून त्यात अग्नीसुरक्षेबाबत सखोल माहिती देण्यात आली आहे. या माहिती पुस्तकांच्या 5 हजार प्रती छापण्यात आल्या असून लवकरच शहरातील रहिवासी सोसायट्या यांना त्याचे वाटप करण्यात येणार आहे.

# 'विरंगुळा' काव्यसंग्रहाचे प्रकाशन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ज्येष्ठ कवि रामचंद्र परब यांच्या 'विरंगुळा' या दुसऱ्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ५ एप्रिल रोजी माटुंगा सांस्कृतिक केंद्र येथे एका विशेष कार्यक्रमात करण्यात आले. याप्रसंगी विचारमंचावर राज्याचे माजी गृह राज्य मंत्री बाळा नांदगावकर, सिनेदिग्दर्शक, लेखक केदार शिंदे, राज्याचे माजी मोटार वाहन विभाग आयुक्त डी.जी. जाधव, लेखक-पत्रकार राजेंद्र घरत उपस्थित होते.

आपण गेली अनेक वर्षे परब यांना ओळखत असून त्यांनी विविध विषयांवर कविता केल्या आहेत. विषयांचे वेगळेपण दर्शवणे, सर्वसामान्यांना भावणाऱ्या कविता लिहीणे ही त्यांची आवड असून त्यांनी याहीपुढे काव्यलेखनात सातत्य ठेवावे अशा शब्दात नांदगावकर यांनी कविवर्यांना शुभेच्छा दिल्या. आपण लेखक, नाटककार झालो; कवि होणे काही जमले नाही असे आपल्या मनोगतात केदार शिंदे म्हणाले व कवितांमधील वैविध्यांबद्दल त्यांनी परब यांचे कौतुक केले.

लेखक-पत्रकार राजेंद्र घरत यांनी कवि परब यांच्या अनेक कविता, पत्र, लेख आपण संपादित करत असलेल्या अंकांमधून प्रसिध्द केल्याच्या स्मृती आपल्या भाषणातून यावेळी जागवल्या व पराकोटीचा साधेपणा; निष्पाप, निरागस वागणे व प्रसंगी पसरट वाटले तरी अगत्याचे, विनम्र बोलणे व तन्मयतेने लिहीणे याचे आपणास आकर्षण असल्याची भावना मांडली.

कवि परब यांनी ज्या राज्य मोटार वाहन विभागात काम केले तेथील माजी आयुक्त डी. जी. जाधव यांनी कवि परब ही तरल, कविमनाची व्यवती आमच्यासारख्या रुक्ष-व्यवहारी विभागात काम करण्यास 'अनफिट' असल्याचे मजेशीर निरीक्षण नोंदवत त्यांनी नोकरीत असताना व आताही जे संवेदनशील मन, तरल वृत्ती जोपासली आहे याकडे लक्ष वेधून परब यांना पुढील लिखाणासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे आयोजन परब कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांभुळी गावचे अनेक हितचिंतक तसेच मुंबईत माझगाव येथे त्यांच्या वास्तव्यात जोडलेले शेजारी, परिवहन विभागातील नोकरीतील सहकारी, ठाणे, मुंबई-नवी मुंबई, पनवेल परिसरातून आलेले अनेक रसिक, श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन वैशाली केतकर यांनी केले.

# रायते उल्हासनदी पुलानजीक ३२ वर्षीय तरूण बुडाला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण ग्रामीण मधील रायते पुलाजवळ एक 32 वर्षीय तरूण रविवारी उल्हासनदीत बुडल्याची दुर्दैवी घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रायते येथे राहणाऱ्या सुवर्णा खंडागळे यांच्या कडे विधी कार्यक्रमानिमित्ताने नेवासा तालुक्यातील सरवडी गावातील भाऊ भाऊसाहेब नानासाहेब बारस्कर वय 32वर्षे आला होता. रविवारी दुपारी 12.30वाजण्याच्या सुमारास बहिणी बरोबर रायते पुलाजवळ कपडे धुण्यासाठी गेला असता.उल्हासनदी काठाजवळ पाय घसरल्याने तो नदीपत्रातील पाण्यात पडला. आणि खोल पाणी आणि अंदाज न आल्याने नदीच्या पाण्यात बुडला.

या घटनेची टिटवाळा पोलिसांनी दखल घेत पीएसआय प्रशांत जाधव यांनी घटनास्थळी पोहचत टिटवाळा अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने शोध कार्य सुरू केले. दोन अडीच तासाच्या शोध मोहीम अंतर्गत 5.30वा.सुमारास रायते पुलाच्या खालील नदीच्या पाण्यात बुडालेल्या भाऊसाहेबचा देह अग्निशमन दलाच्या जवानांच्या हाती लागला. पाण्याबरोबर देहाला अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले आणि रूग्णालयात देह नेला असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी टिटवाळा पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास टिटवाळा पोलीस करीत आहेत. टिटवाळा अग्निशमन केंन्द्राचे लिडिंग फायरमन आणि पथकाने देह शोधण्यासाठी अथक प्रयत्न केले.

# मुख्याध्यापक सहविचार सभेत अनेक विषयांवर सखोल चर्चा



## ठाणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ संयुक्त विद्यमाने आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्याध्यापक सहविचार सभा महात्मा गांधी विद्यालय अंबरनाथ येथे शनिवारी उत्तमरित्या पार पाडण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करत असताना शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या संबंधित आधार व्हॅलिडेशन, अपार आयडी जनरेशन, निपुण भारत अंतर्गत एफएलएन कार्यक्रम, संच मान्यता स्कॉफ पोर्टलवर माहिती भरणे, तसेच शाळांच्या प्रशासकीय व आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी उपाययोजना अशा अनेक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी ठाणे जिल्हा माध्य. शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी लेखाधिकारी दिलीप घनगाव, उपशिक्षणाधिकारी मोहिते, संदीप पाटील, महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन सदस्य प्रशांत भामरे, शिक्षण उपनिरीक्षक उपसंचालक कार्यालय भक्ती गोरे हे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष गणेश पाटील यांनी प्रास्ताविक सादर केले. ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव प्रवीण लोंढे, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळ मुंबई विभागीय अध्यक्ष अनिल पाटील, अंबरनाथ तालुका मुख्याध्यापक संघ अध्यक्ष पंजाबराव बडगे, सचिव विजय राणे व मुख्याध्यापक संघाच्या सर्व जिल्हा कार्यकारी पदाधिकारी तसेच सर्व तालुका कार्यकारी पदाधिकारी यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

दिलीप कणसे, संतोष बनगे यांनी कार्यक्रमासाठी सभागृहाची व्यवस्था निशुल्कपणे करून दिली. आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, लेखाधिकारी दिलीप घनगाव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

# कोरावळे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सुरुवात





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील विविध ठिकाणी श्री रामनवमीचे औचित्य साधून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले त्याच धर्तीवर कोरावळे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे श्री रामनवमीचे औचित्य साधून ते चैत्र पौर्णिमा म्हणजेच हनुमान जयंती पर्यंत अर्थात ६ एप्रिल ते १३ एप्रिल २०२५ पर्यंत करण्यात आले आहे. या सात दिवसाच्या सप्ताहामध्ये प्रवचन, हरिपाठ, काकड आरती, किर्तन सेवा इत्यादी सेवेद्वारे प्रबोधन करण्यात येणार आहे.

तसेच कोरावळे गावामध्ये गेली ३६ वर्ष अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होत आहे त्यामुळे या गावातील सर्व वारकरी संप्रदाय पंथातील तसेच भक्तगण मोठ्या भक्ती भावाने या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सोहळयात उपस्थित राहून श्री ज्ञानेश्वर ग्रंथराज पारायण सोहळयाचं वाचन करण्यात येत असतं,, तसेच सात दिवस विविध प्रकारची ह भ प कीर्तन महाराज यांच्याद्वारे किर्तन सेवा केली जाते. यंदा विशेषता कै.महादू देऊ भालेराव यांच्या स्मरणार्थ हनुमंत मंदिरात या अखंड हरिनाम सप्ताहाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन अधिस्वीकृती पत्रकार बाळासाहेब भालेराव यांच्या वतीने श्री ज्ञानेश्वर माऊलीची मूर्ती कायमस्वरूपी मूर्तीदान करण्यात आली आहे.

तसेच १३ एप्रिल २०२५ रोजी काल्याचे कीर्तन सेवा होणार आहे त्या दिवशी कोरावळे गाव पंचक्रोशीतील सर्व भक्त भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन कोरावळे ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024